दैनिक सागर दिनांक :- ०२/१०/२०२४
वार :- बुधवार.

# महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ

## उप प्रादेशिक कार्यालय महाड

## पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणीची सूचना

वने, पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्रालय, भारत सरकार यांची अधिसूचना दि.१४.०९.२००६ अन्वये मे. जेएसडब्ल्यू एनर्जी पीएसपी सेव्हन लिमिटेड आधारित १५०० मेगावॅट क्षमतेचा पाने ओपन लूप पंप स्टोरेज प्रकल्प गावः पाने आणि वाघेरी, तालुकाः महाड, जिल्हा, रायगड येथे प्रस्तावित प्रकल्पाकरीता पर्यावरण विषयक जनसुनावणीचा अर्ज महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे प्राप्त झाला आहे. सदर प्रस्तावित प्रकल्पाबाबत पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी आयोजीत करण्यात येत आहे. जनसुनावणीचे ठिकाण, दिनांक व वेळ खालीलप्रमाणे नमूद केलेली आहे.

पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांचे निवेदन क्रं. F.No. २२-२५/२०२० IAIII दि. ९/०६/२०२१, नूसार ऑनलाईन पद्धतीने जनसुनावणी घेण्यात येऊ शकते व त्यासोबतच कोरोना विषाणुच्या प्रादुर्भावाच्या पूर्वी जशी जनसुनावणी सामान्य पद्धतीने घेण्यात येत होती तशी देखील, सामाजिक अंतर राखून व संबंधित नियमांचे पालन करून जनसुनावणी घेण्यात येऊ शकते. सदर जनसुनावणी खालीलप्रमाणे आयोजित करण्यात येत आहे.

**सुनावणीची तारीख** :- ०५/११/२०२४
**सुनावणीची वेळ** :- दुपारी ३.०० वाजता
**स्थळ** :- हॉटेल फाऊंटन इन (लॉन), मु.पो. नडगाव तर्फे बिरवाडी, सावित्री ब्रीज जवळ, मुंबई-गोवा हायवे, ता. महाड, जि. रायगड, पिन नं. ४०२३०९.

सदर प्रकल्पाबाबत लेखी स्वरूपात विचार, टिका, टिप्पणी ही जाहिरात प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसांच्या आत जाहीर जनसुनावणीच्या तारखेपुर्वी खालील पत्त्यावर पाठविण्यात याव्यात.

| | |
|---|---|
| **प्रादेशिक कार्यालय,**<br>**महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,**<br>रायगड भवन, ६ वा मजला, सेक्टर-११,<br>सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४. | **उप-प्रादेशिक कार्यालय, महाड,**<br>**महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,**<br>सी. एफ. सी. बिल्डींग, म. औ.वि. महामंडळ, परिसर,<br>ता. महाड, जि. रायगड : ४०२ ३०९. |

त्याचप्रमाणे, सदर प्रकल्पाच्या परिसरामधील रहिवासी, पर्यावरण विषयी काम करणाऱ्या संस्था, सदर प्रकल्पामुळे अन्य प्रकारे प्रभावीत होणारे रहिवासी यांना सदर प्रकल्पासंबंधी विचार, टिका, टिप्पणी तोंडी किंवा लेखी स्वरूपात जाहीर सुनावणी दरम्यान व Webex Meet App वर नोंदविता येतील.

सदर प्रकल्पाविषयी व पर्यावरण मुल्यांकन आघात अहवालाच्या सारांशाची माहिती असलेले दस्तावेज (इंग्रजी व मराठी) मध्ये खालील कार्यालयांमध्ये उपलब्ध आहेत. संबंधीत व्यक्ती खालील कार्यालयामध्ये सदर कागदपत्रे कार्यालयीन वेळेत अभ्यासू शकतील.

१. जिल्हाधिकारी कार्यालय, रायगड, अलिबाग
२. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, रायगड-अलिबाग
३. महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, रायगड-अलिबाग,
४. तहसिलदार, तहसिल कार्यालय, महाड, जि. रायगड
५. गट विकास अधिकारी, पंचायत समिती, ता. महाड, जि. रायगड
६. मुख्याधिकारी, महाड नगरपरिषद, ता. महाड, जि. रायगड
७. प्रादेशिक कार्यालय, म.प्र.नि. मंडळ, ६ वा मजला, रायगड भवन, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई
८. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुख्यालय, कल्पतरु पॉईन्ट, ३ रा मजला, सायन माटुंगा स्कीम रोड नं.८, सायन सर्कल समोर, सायन (पूर्व), मुंबई-२२.
९. पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, महाराष्ट्र शासन, नवीन प्रशासन भवन, १५ वा मजला, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई-३२..
१०. प्रादेशिक कार्यालय, पर्यावरण, वने व वातावरणीय बदल मंत्रालय, पश्चिम विभाग, तळ मजला, पूर्व बाजू, नवीन सचिवालय इमारत, सिव्हील लाईन्स, नागपूर-४४०००१.
११. सहसंचालक, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य, रायगड, ६ वा मजला, कोकण भवन विस्तार, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई.
१२. सह मुख्य विस्फोटक निरिक्षक, अ-१ व अ-२ विंग, ५ वा मजला, सीजीओ कॉम्प्लेस, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई.
१३. **ग्रामपंचायत कार्यालयेः-** ग्रुप ग्रामपंचायत पाने, ग्रामपंचायत वारंगी, ग्रामपंचायत दापोली, ग्रुप-ग्रामपंचायत निजामपूर-वाघेरी-रायगडवाडी- छत्री निजामपूर, ग्रामपंचायत बावले, ग्रामपंचायत सांदोशी, ग्रामपंचायत पाचाड, ग्रामपंचायत वालसुरे, ग्रामपंचायत कॉझर, ग्रामपंचायत वाघोली, ग्रुप ग्रामपंचायत पंदेरी- पंदेरी-मांघरून-देवघर, ग्रामपंचायत सावरट, ग्रामपंचायत गरजेवाडी, ग्रुप ग्रामपंचायत वाकी बु. शेवते, ग्रामपंचायत पांगारी, ग्रामपंचायत वरंडोली, ग्रुप ग्रामपंचायत मांडले-पारवाडी, ग्रामपंचायत तळोशी, ग्रामपंचायत चापगाव, ग्रामपंचायत पुनाडे, ग्रामपंचायत खर्डी, ग्रामपंचायत कोतुर्डे, ग्रामपंचायत नेराव, ग्रामपंचायत करमार, ग्रुप ग्रामपंचायत वाळण खुर्द- आड्राई, ग्रामपंचायत दाभेकर कोंड, ग्रामपंचायत कुंभे माच, ग्रामपंचायत कावळे, ग्रुप ग्रामपंचायत वाळण-बुद्रुक झोलीचा कोंड केतकीचा कोंड, ग्रामपंचायत धामणे
१४. मराठी आणि इंग्रजीमध्ये कार्यकारी सारांश म.प्र.नि. मंडळाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

सही/-
( ईश्वर ठाकरे )
उप-प्रादेशिक अधिकारी,
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, महाड